ठाण्यातील ब्रम्हांड परिसरामधील विद्युत वाहिन्या भुमीगत करण्यासंदर्भात डॉ. संजीव नाईक यांनी महावितरण कंपनीला दिलेल्या निवेदनाची दखल घेण्यात आली असुन या वाहिन्या इन्फ्रास्ट्रक्चर योजनेतंर्गत भुमीगत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच मनोरमा नगर परिसरातही ६३० के.व्ही.ए. चा ट्रान्सफॉर्मर बसवण्यासाठी अनुकुलता दर्शवली आहे. खासदार आपल्या दारी या उपक्रमातंर्गत या परिसरामधील रहिवाशांनी डॉ. संजीव नाईक यांच्याकडे हि मागणी केली होती.

ब्रम्हांड परिसरातील विद्युत पुरवठा करणारी विद्युत वाहिनी पातलीपाडा केंद्रातुन जंगलाच्या परिसरामधुन येते. पावसाळ्यात अनेकवेळा या विद्युत वाहिन्या तुटत असल्यामुळे या परिसरामधील विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होतो. खासदार आपल्या दारी या उपक्रमामध्ये ब्रम्हांड परिसरातील विद्युत वाहिन्या भुमीगत कराव्यात अशी मागणी या परिसरातील रहिवाशांनी डॉ. संजीव नाईक यांच्याकडे केली होती. त्यानंतर डॉ. संजीव नाईक यांनी यासंदर्भात एम.एस.ई.डी.सी.एल. चे मॅनेजिंग डायरेक्टर अजय मेहता यांना पत्र दिले होते. या पत्राची महावितरण कंपनीने दखल घेतली असुन इन्फ्रास्ट्रक्चर योजनेतंर्गत या परिसरातील विद्युत वाहिन्या भुमीगत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. डॉ. संजीव नाईक यांच्या प्रयत्नामुळे इथल्या रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मनोरमा नगर येथेही डॉ. संजीव नाईक यांच्या प्रयत्नाने ६३० के.व्ही.ए. चा नविन ट्रान्सफॉर्मर बसवण्यासाठी महावितरण कंपनीने अनुकुलता दर्शवली आहे. जागेची अडचण असल्यामुळे हा ट्रान्सफॉर्मर बसवण्याचे काम रखडले होते. ज्येष्ठ नगरसेवक देवराम भोईर यांनी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी तयारी दर्शवली असुन हे ट्रान्सफॉर्मर बसवण्याचे काम लवकरच सुरु होणार आहे. मनोरमा नगरतंर्गत अशोकनगर, आनंदनगर, संभाजीनगर या भागातील लोकसंख्या वाढली असल्याने वीजेची मागणीही मोठ्या प्रमाणात वाढली होती. या नविन ट्रान्सफॉर्मरमुळे वारंवार खंडीत होणारा वीजपुरवठा सुरळीत चालणार असुन रहिवाशांची विजेची समस्या सुटणार आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सरचिटणीस मनोहर डुंबरे यांनी ब्रम्हांड परिसरात खासदार आपल्या दारी या उपक्रमाचे आयोजन केले होते.